## प्रेसनोट दिनांक-३१/०३/२०२६

**निष्काळजीपणे वाहन चालवुन मृत्युस कारणीभुत झालेल्या आरोपीस दोन वर्षे सक्त कारावास व रु. २,०००/- दंडाची शिक्षा.**

**रहिमतपूर - दिनांक२२/०७/२०१८ रोजी रात्री ०८.३० वा.चे सुमारास मौजे रहिमतपुर ता.कोरेगाव जि सातारा**

आरोपी मुकंदर दिलावर शेख वय-३० वर्षे रा.जिहे.ता.जि.सातारा याने मौजे सायगांव धामणेर ता.कोरेगांव जि.सातारा गावचे हद्दित कॅनॉलचे पुलावर फिर्यादी धनराज अशोक जठार रा.बोरगांव ता.कोरेगांव जि.सातारा व त्यांचे मित्र हर्षल हरिदास तांदळे व कृष्णात रामचंद्र भोसले असे धामणेर रेल्वेस्टेशन वरुन हॉटेल रानमळा येथे जेवणाकरीता आपले ताब्यातील मोटारसायकल क्रं.एम.एच.११-बी.यु.८६०३ वरुण जात असताना रहिमतपुर बाजुकडुन येणाऱ्या मारुती व्हॅन क्र.एम.एच.११-बी.के.०१८० वरील चालक नामे मुकंदर दिलावर शेख वय ३० वर्षे रा.जिहे ता.जि.सातारा याने भरदाव वेगाणे येवुन मोटारसायकल ला जोरदार धडक देवुन अपघात केला.सदर अपघाता मध्ये फिर्यादी स्वत: तसेच त्याचा मित्र हर्षल तांदळे याना गंभीर जखमी करुन तसेचकृष्णात रामचंद्र भोसले वय २४ रा.बोरगांव ता.कोरेगांव जि.सातारा यांचे मृत्युस कारणीभुत झाला म्हणून वगैर **म्हणून वगैरे मजकुरची फिर्यादी वरुन रहिमतपूर पोलीस स्टेशनला गुन्हा रजि.दाखल करण्यात आलेला होता.**

**सदर गुन्हयाचा तपास करुण तात्कालीन तपासी अधीकारी श्री.सहा.पोलीस उपनिरीक्षक पी.एस.डोंबाळे रहिमतपूर पोलीस ठाणे यांनीमा.न्यायालयात सदर गुन्हयाचे दोषारोपपत्र पाठवण्यात आले होते.**

सदरचा खटला **मा.श्री.अरविंद शं.वाघमारे सो प्रमुख** जिल्हा व सत्र न्यायाधीश सो सातारा यांचे कोर्टात चालला होता. **सरकार तर्फे श्री आर.एन.मडके जिल्हा सरकारी वकील,** सातारा यांनी खटल्याचे कामकाज पाहिले.नमुद केस मध्ये एकुण **८ साक्षीदार** तपासले. परिस्थितीजन्य पुरावा तसेच अन्य साक्षीदारांचे साक्षीवरून व जिल्हा सरकारी वकील यांचा युक्तीवाद व आरोपीने केलेल्या कृत्या बाबत मा. उच्च न्यायालय,सर्वोच्च न्यायालयाचे न्यायनिवाडे यांचे दाखले न्यायालयात सादर केलेने समोर आलेला पुरावा ग्राहय मानुन मा.न्यायाधीश **श्री.अरविंद शं.वाघमारे सो प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सो सातारा** यांनी आज **दि.३१/०३/२०२६ रोजी यातील आरोपी यास** भा.द.वि.स.कलम ३०४(अ) अन्वये २ वर्षे सक्त मजुरी व २,०००/- रुपये दंड दंड न भरल्यास १ महिना साधी कैद,भा.द.वि.स.कलम २७९ अन्वये सहा महिने सक्त मजुरीव ५००/- रुपये दंड दंड न भरल्यास १५ दिवस साधी कैद,भा.द.वि.स.कलम ३३८ अन्वये ६ महिने सक्त मजुरी आणि ५००/- रुपये दंड दंड न भरल्यास १५ दिवस साधी कैद,भा.द.वि.स.कलम ३३७ अन्वये ६ महिने सक्त मजुरी आणि ५००/- रुपये दंड दंड न भरल्यास १५ दिवस साधी कैद,भा.द.वि.स.कलम ४२७ अन्वये २ वर्षे सक्त मजुरी व २,०००/- रुपये दंड दंड न भरल्यास १ महिना साधी कैद,मो.वा.का कलम १३४(अ)(ब) १८७ अन्वये ६ महिने सक्त मजुरी व ५०० रु दंड दंड न भरल्यास १५ दिवस साधा कारावास **अशी शिक्षा ठोठावण्यात आली आहे.**

**मा. श्री. तुषार दोशी पोलीस अधीक्षक सातारा, मा. डॉ. वैशाली कडुकर अपर पोलीस अधीक्षक सातारा,श्रीमती राजश्री तेरणी उपविभागीय पोलीस अधिकारी कोरेगाव विभाग कोरेगाव वश्री. विनोद नेवसे सहाय्यक पोलीस निरीक्षक रहिमतपूर पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली पैरवी अधिकारी म्हणुन विनोद मोरे पो.कॉ ब.नं.१३५६ रहिमतपूर पोलीस स्टेशन यांनी कामकाज पाहिले.**

**पोलीस अधीक्षक सातारा करीता.**